जा.क्र.ई-04/पदोन्नती/पोहवा.वितं.ते सपोउनि.वितं./2016 / 5470
अपर पोलीस महासंचालक व संचालक यांचे कार्यालय,
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे-08.
दिनांक :- 31 ऑगस्ट, 2016

विषय :- पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस हवालदार (विजतंत्री) यांचे सहायक पोलीस उपनिरीक्षक (विजतंत्री) या पदावरील पदोन्नतीवर नेमणुकीबाबत.
**(निवड सुची सन - 2015-2016)**

--- 000 ---

**आदेश :-**

**भाग-1**

पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमुद पोलीस हवालदार/विजतंत्री यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांनी कार्यभार ग्रहण केल्याच्या तारखेपासून सहा.पोलीस उपनिरीक्षक/विजतंत्री या पदावर स्थानापन्न व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची ( **Provisional** ) पदोन्नती देऊन नेमणूक देण्यात येत आहे.

पोलीस हवालदार (वीजतंत्री) :- वेतनश्रेणी रु.5200-20200/- अधिक श्रेणी वेतन रु.2400/-
सहायक पो.उपनिरीक्षक (वीजतंत्री) :- वेतनश्रेणी रु.5200-20200/- अधिक श्रेणी वेतन रु.2800/-

| अ. क्र. | पोलीस हवालदार/ विजतंत्री यांचे नांव व जातीचा प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणूकीचे ठिकाण व आस्थापना | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातून | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री.भोळे निळकांत काशिनाथ. **मराठा (खुला)** | **गडचिरोली** पोलीस अधीक्षक, गडचिरोली | **औरंगाबाद परिक्षेत्र** पोलीस अधीक्षक बि.सं.पुर्व विभाग, नागपूर | **खुल्या प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| 02 | श्री.चव्हाण-पाटील आनंदा बापू **मराठा (खुला)** | **कोल्हापूर** पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | **ठाणे शहर** पोलीस आयुक्त, ठाणे शहर | **खुल्या प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| 03 | श्री.खोमणे सुखदेव अर्जुन **शेगर (भज-क)** | **महामार्ग पोलीस खडकी** पोलीस उप अधीक्षक बि.सं.कोकण परिक्षेत्र | **कोकण परिक्षेत्र** पोलीस अधीक्षक बि.सं.पश्चिम विभाग, पुणे | **भज-क प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| 04 | श्री.कोटांगळे मनोहर मारोती **महार (अजा)** | **देवरी-गोंदिया** पोलीस अधीक्षक गोंदिया | **नागपूर परिक्षेत्र** पोलीस अधीक्षक बि.सं.पुर्व विभाग, नागपूर | **अ.जा. प्रवर्गातून** | रिक्त पदावर |

**भाग-2**

खालील नमूद पोलीस हवालदार/विजतंत्री यांना त्यांचेपेक्षा सेवेने ज्येष्ठ असलेले श्री.ठाकूर अनंत नरहरी (ठाकूर-अज) यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने, श्री.ठाकूर यांची सेवाज्येष्ठता अबाधित ठेवून त्यांचे लगतचे कनिष्ठ असलेले श्री.राणे निलसिंग लालसिंग, पोलीस हवालदार/विजतंत्री यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-1207/प्र.क्र.53/08/16-ब, दिनांक 16/06/2008 नुसार सहायक पोलीस

उपनिरीक्षक / विजतंत्री पदावर 11 महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात त्यांचे नावासमोर दर्शविल्या ठिकाणी पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस हवालदार/ विजतंत्री यांचे नांव व जातीचा प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणूकीचे ठिकाण व आस्थापना | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातून | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री.राणे निलसिंग लालसिंग **पारधी (अज)** | **वाशिम** पोलीस अधीक्षक, वाशिम | **संशोधन व विकास, पुणे** संचालक आस्थापना, पुणे | अज प्रवर्गातून | 11 महिन्यासाठी तात्पुरती पदोन्नती |

2. वरीलप्रमाणे श्री.राणे यांना देण्यात आलेली पदोन्नती फक्त 11 महिन्याकरीता वा ज्येष्ठ कर्मचारी जातवैधता प्रमाणपत्र सादर करेल यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत सुरु राहिल. तथापि या कालावधीत ज्येष्ठ कर्मचा-याने जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास ही पदोन्नती एक दिवसाचा (सुट्टीचा कालावधी वगळून) खंड देऊन पुढे चालू राहिल. या तात्पुरत्या पदोन्नतीचे परिणामी कनिष्ठ कर्मचारी यांना सेवा ज्येष्ठतेचा हक्क राहणार नाही.

1) उपरोक्त पोलीस हवालदार (विजतंत्री) यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होणेसाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे आणि त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक त्याच दिवशी या कार्यालयास कळवावा. तसेच त्यांनी पदोन्नतीचे ठिकाणी सहायक पोलीस उपनिरीक्षक (विजतंत्री) पदाचा स्वीकारल्याचा दिनांकसुद्धा कळवावा.

2) उपरोक्त पदोन्नती झालेल्या विजतंत्री यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला असेल/ निलंबनाची कार्यवाही केलेली असेल/ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असेल, ते एखादी शिक्षा भोगत असतील तर संबंधित घटकप्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांचेविरुद्धच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास फॅक्सद्वारे पाठवावी आणि पुढील आदेशाची वाट पाहावी.

3) उपरोक्त आदेशात नमूद केलेल्या विजतंत्री यांचेविरुद्ध विभागीय चौकशी प्रलंबित आहे अथवा विभागीय चौकशीत निर्गमित केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही अशा विजतंत्री यांचेकडून त्यांना भविष्यात होणार शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगणेस तयार असल्याबाबत दिनांकीत स्वाक्षरी केलेले लेखी हमीपत्र घेऊन, सदर हमीपत्राच्या अधीन राहूनच पदोन्नतीवर सोडण्यात यावे. तसेच संबंधित यंत्रचालक यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशातही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशाची व संबंधितांच्या लेखी हमीपत्राची प्रत या कार्यालयास सादर करावी.

4) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.8452/2004 मध्ये दिनांक 09/03/2007 रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दिनांक 28/03/2008 रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या पदावरील सर्व पदोन्नत्या या मूळ याचिका क्र.8452/2004 च्या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. तसा स्पष्ट पदोन्नतीच्या आदेशामध्ये उल्लेख करण्यासंदर्भात शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-2001/1887/प्र.क्र./64/1/16-ब, दिनांक 01/04/2008 अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठापुढे दाखल केलेला मूळ अर्ज

क्र.1180/2010 मध्ये मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून संबंधित पोलीस हवालदार (विजतंत्री) यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक (विजतंत्री) या पदावर पदोन्नती देण्यात येत आहे.

5) पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांना सदरची पदोन्नती स्वीकारण्याची इच्छा नाही अशा कर्मचा-यांचे लेखी अर्ज 7 दिवसांत या कार्यालयात सादर करण्याची संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

6) जे कर्मचारी / रजेवर/ गैरहजर/सीकमध्ये (रुग्णनिवेदनात) असल्यास, ते प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारलेल्या दिनांकापासून पदोन्नतीस पात्र राहतील.

7) वर नमूद सर्व कर्मचारी यांच्या पदोन्नती आदेशाची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात संबंधित आस्थापना प्रमुख यांनी त्वरीत घेऊन त्याप्रमाणे त्यांची वेतननिश्चिती करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास 7 दिवसात सादर करावा.

8) सदरची पदोन्नतीवरील नियुक्ती महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील तरतूदीनुसार करण्यात येत आहे.

9) पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतन निश्चितीकरिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर 1298/ प्रक्र-13/98/सेवा-10 दि.10/12/ 1998 च्या आदेशाची माहिती सहा.पोलीस उपनिरीक्षक/विजतंत्री या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन ) नियम - 1981, नियम क्र.11(एक) (ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

10) कालबद्ध पदोन्नती घेतली असल्यास संबंधित कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती अनुज्ञेय असणार नाही. संबंधित कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील तर त्यांची कालबद्ध पदोन्नती (वरिष्ठ वेतनश्रेणी) काढून घेण्यात यावी आणि त्याप्रमाणे अहवाल सादर करावा.

11) उपरोक्त पदोन्नती झालेल्या पोलीस हवालदार(विजतंत्री) यांचे संबंधित आस्थापना अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांच्या सेवापुस्तकामध्ये पदोन्नतीचा आदेश क्रमांक व दिनांकाची नोंद घ्यावी.

**पदोन्नती झालेल्या सर्व पोलीस हवालदार (विजतंत्री) यांचे आम्ही अभिनंदन करीत आहोत आणि पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा देत आहोत.**

**( जगन नाथ )**
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य,पुणे-08.

**प्रति,**

पोलीस अधीक्षक, गडचिरोली/कोल्हापूर/गोंदिया/वाशिम
पोलीस अधीक्षक, बि.सं.,पूर्व विभाग, नागपूर./पश्चिम विभाग, पुणे.
सहायक पोलीस आयुक्त, बि.सं. ठाणे शहर
पोलीस उपअधीक्षक, बि.सं., नागपूर/औरंगाबाद/कोकण परिक्षेत्र. व सं.व वि.पुणे

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

**प्रत :** पोलीस उपआयुक्त, बिसं.,मुंबई.

पोलीस उपअधीक्षक, बिसं.,कोल्हापूर/अमरावती परिक्षेत्र.

पोलीस निरीक्षक,बि.सं.गडचिरोली/कोल्हापूर/गोंदिया/वाशिम/

पोलीस उपनिरीक्षक बि.सं.महामार्ग पोलीस, खडकी-पुणे

**स्थानिक प्रती :-**

पोलीस अधीक्षक बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे.

प्रमुख लिपिक, लेखा शाखा/ आस्थापना शाखा - 02/ भरती कक्ष / क शाखा.